



# ज्योतिर्मय

साहित्याचे विद्यापीठ

Online Journal of Literature....

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक ५ वा ❑ भारतीय सौर दिनांक ११ माघ शके १९४७, शनिवार दि.३१ जानेवारी २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## आश्रम शाळांमधील विद्यार्थ्यांना अन्नातून विषबाधा का होते?

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय साहित्य**

आदिवासी आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांच्या विषबाधेच्या प्रश्न नेहमीच ऐरणीवर असतो.राज्यातील आश्रम शाळांमधील विद्यार्थ्यांना कधी जेवणातून,तर कधी दुधातून विषबाधा होऊन विद्यार्थ्यांची प्रकृती खालावत असते.अनेक विद्यार्थ्यांना अन्नातून विषबाधा होवून विद्यार्थी दगावले देखील आहे. आश्रम शाळांमधील विद्यार्थ्यांच्या विषबादीचा प्रश्न अतिशय गंभीर असताना देखील प्रशासनाला,आश्रम शाळांमधील व्यवस्थापनाला व तेथील कर्मचारी बिनधास्त असतात.

आदिवासी व डोंगराळ भागातील विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून राज्यात आश्रम शाळांची स्थापना करण्यात आली.राज्यात प्रामुख्याने दुर्गम, डोंगराळ आणि आदिवासी भागातील मुला–मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी, तसेच शिक्षणातील गळती रोखण्यासाठी आश्रमशाळा ( स्थापन करण्यात आल्या आहेत. १९५३–५४ मध्ये ठक्करबाप्पा यांनी या संकल्पनेची सुरुवात केली, ज्यांचा उद्देश मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मोफत निवास, भोजन आणि शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देणे हा होता.

आदिवासी आणि मागास जमातींच्या मुलांना शिक्षणाच्या समान संधी मिळाव्यात आणि त्यांची शैक्षणिक व आर्थिक प्रगती व्हावी.हा उद्देश समोर ठेवून या विद्यार्थ्यांना

निवास व भोजनाची सुविधा शाळांमध्ये उपलब्ध करून देण्यात आली.दुर्गम भागात शाळा नसल्यामुळे किंवा घरापासून दूर शाळा असल्याने मुले शिक्षण सोडून देत (गळती), ही समस्या सोडवण्यासाठी निवासासह शिक्षणाची व्यवस्था करण्यात आली. आश्रमशाळांमध्ये मोफत शिक्षण, राहणे आणि जेवण उपलब्ध असल्याने पालकांचा खर्च वाचतो.विद्यार्थ्यांना

गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळते आदिवासी मुलांचा सर्वांगीण विकास करणे आणि त्यांना मुख्य प्रवाहात आणणे. हा उद्देश आश्रम शाळा स्थापन करण्यामागील आहे.

१९६९–७० मध्ये, महाराष्ट्रात गिरिजन, विमुक्त जमाती आणि भटक्या जमातींसाठी या संस्था प्रामुख्याने सुरू करण्यात आल्या होत्या. मात्र राज्यातील अनेक आश्रम शाळा या ना त्या कारणांमुळे नेहमीच चर्चेत असतात.अन्नातून विषबाधा हा नित्याचा प्रश्न झाला असून राज्यातील अनेक आश्रम शाळांमधील विद्यार्थी अन्नातील विषबाधे त्रस्त आहेत.

बुलढाणा तालुक्यातील येळगावं येथील पैंनगंगा आदिवासी आश्रम शाळेतीतील १३ विध्यार्थीनींना विषबाधा झाल्याची घटना घडली असताना आता परत एकदा गडचिरोली जिल्ह्यातील लाहेरी आश्रम शाळेतील ६० मुलांना अन्नातून विषबाधा झाल्याने या विद्यार्थ्यांची प्रकृती बिघडली दरम्यान या घटनेने आदिवासी विभागात खळबळ उडाली.

रात्रीचे जेवण केल्यानंतर काही विद्यार्थ्यांना अस्वस्थ वाटू लागले होते. मात्र, बुधवारी सकाळी ११ वाजेच्या सुमारास एकामागून एक अशा ६० विद्यार्थ्यांची प्रकृती एकाएकी बिघडली. सर्वांना मळमळ आणि तीव्र पोटदुखीचा त्रास होऊ लागल्याने शाळेतील कर्मचाऱ्यांची धावपळ उडाली. सुरुवातीला विद्यार्थ्यांना स्थानिक लाहेरी प्राथमिक आरोग्य केंद्रात नेण्यात आले, परंतु परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेता ४२ विद्यार्थ्यांना तातडीने भामरागड येथे हलवण्यात आले. अन्नातून विषबाधा झाल्याचा प्राथमिक अंदाज डॉक्टरांनी वर्तविला आहे.

या आश्रमशाळेत पहिली ते बारावीपर्यंतचे एकूण ३०० विद्यार्थी शिक्षण घेतात. हे सर्व विद्यार्थी अतिदुर्गम भागातील आहेत. इतक्या मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांना विषबाधा झाल्याने आश्रमशाळेतील जेवणाच्या दर्जाबाबत आता प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

प्रश्न एका आश्रम शाळेचा नाही,राज्यातील अनेक आश्रम शाळांमधून अन्नातून विषबाधेचा प्रश्न अधून मधून समोर येत असतो.या प्रश्नाकडे गांभीर्याने बघण्याची गरज असून शासन व प्रशासनाने याकडे वेळीच लक्ष घालणे आवश्यक आहे.

आश्रम शाळांमधील विद्यार्थ्यांना होणाऱ्या विषबाधेमागे प्रामुख्याने निकृष्ट दर्जाचे अन्न, अस्वच्छता, खराब पाणी आणि प्रशासकीय निष्काळजीपणा ही मुख्य कारणे आहेत. शिळे अन्न, उघड्यावर ठेवलेले पदार्थ, अन्नात अळ्या किंवा पाली पडणे, आणि भाजीपाल्यामध्ये कीटकनाशकांचा अंश असणे यांमुळे मुले आजारी पडतात.

विषबाधेची प्रमुख कारणे:

निकृष्ट दर्जाचे जेवण: शाळा प्रशासनाकडून अन्नाची गुणवत्ता न तपासणे, शिळे अन्न वाढणे किंवा खराब झालेले धान्य/कडधान्ये वापरणे.

अस्वच्छ स्वयंपाकघर: स्वयंपाकघरातील अस्वच्छता, पाणी पुरवठ्यातील घाण आणि भांडी न धुणे यामुळे अन्नात जंतूंची वाढ होते.

प्रशासकीय निष्काळजीपणा: मेस कंत्राटदार किंवा स्वयंपाकी यांची पर्यवेक्षण न करणे, तसेच जेवणाचे नियमित सॅम्पल न तपासणे.

दूषित पाणी व दूध: अशुद्ध पाण्यामुळे किंवा खराब झालेल्या दुधामुळे मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांना विषबाधा (उलट्या–जुलाब) होते.

वेळेवर वैद्यकीय मदत न मिळणे: विषबाधेची लक्षणे दिसल्यास तातडीने उपचार न मिळाल्यास परिस्थिती गंभीर होते.

भामरागड, बुलढाणा, आणि औरंगाबाद येथील घटनांमध्ये वरील बाबींमुळे विद्यार्थ्यांना रुग्णालयात दाखल करावे लागले होते.

राज्यातील आश्रम शाळां समोर अनेक प्रश्न आहेत.

आश्रम शाळांमधील मुख्य समस्यांमध्ये संरक्षकांचा अभाव, सुसज्ज इमारतींची कमतरता, अस्वच्छता, निकृष्ट दर्जाचे अन्न आणि अपुरे शैक्षणिक साहित्य यांचा समावेश आहे. अनेक शाळांमध्ये पिण्याचे पाणी, शौचालय आणि वीज यांसारख्या मूलभूत सुविधांचा अभाव आहे. सुरक्षिततेच्या दृष्टीने सुरक्षा भिंती नसणे, मुलींच्या वसतिगृहातील समस्या आणि शिक्षकांची रिक्त पदे या गंभीर समस्या आहेत.या समस्यांमुळे आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर आणि सर्वांगीण विकासावर मोठा परिणाम होत आहे. शासनाने यावर तातडीने उपाययोजना करणे गरजेचे आहे.

महाराष्ट्रातील आदिवासी आश्रमशाळांमध्ये गेल्या ५ वर्षांत सुमारे १,००० हून अधिक विद्यार्थ्यांचा, तर १५ वर्षांत १०७७ मुलांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे . प्रामुख्याने आजारपण, कुपोषण आणि अयोग्य देखभालीमुळे या मृत्यूंची नोंद झाली आहे . या शाळांमध्ये नाशिक आणि पालघर सारख्या भागात विद्यार्थ्यांचे मृत्यू ही मोठी गंभीर समस्या बनली आहे. २०१९व २०२१या दोन दोन वर्षांत अपर आदिवासी आयुक्तांच्या कार्यक्षेत्रातील आश्रमशाळांमध्ये शिकत असलेल्या तब्बल १२५ विद्यार्थ्यांचा विविध कारणांनी मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. या विद्यार्थ्यांच्या कुटुंबियांना मदत म्हणून आदिवासी विकास विभागाने प्रत्येक २ लाख रुपयांचे सानुग्रह अनुदान वितरीत करत काहीसा दिलासा देण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो.

# कणकवलीत उद्या दुसरे साहित्य संगीत संमेलन

**ज्योतिर्मय साहित्य**

कणकवली : गेल्या वर्षापासून साहित्य संगीत मित्र मंडळ सिंधुदुर्गतर्फे साहित्य संगीत संमेलन आयोजित करण्यात येते. यावर्षीचे दुसरे साहित्य संगीत संमेलन शनिवार ३१ जानेवारी रोजी दुपारी ३.३० वा. कणकवली शहरातील मराठा नाट्यगृह मध्ये आयोजित करण्यात आले असून संमेलनाची रूपरेषा जाहीर करण्यात आली आहे. यामध्ये उपशास्त्रीय, चित्रपट आणि भावगीते गायन, साहित्य संगीत क्षेत्रातील पुरस्कार वितरण आणि निमंत्रितांचे कवी संमेलन अशा कार्यक्रमांचा समावेश असून संमेलनाच्या अध्यक्षपदी साहित्य अभ्यासक आणि संगीत संशोधक डॉ.निर्मोही फडके यांना निमंत्रित करण्यात आले असल्याची माहिती संमेलनाचे स्वागताध्यक्ष महेंद्र चव्हाण आणि निमंत्रक सुभाष भंडारे यांनी दिली.



एक कला दुसऱ्या कलेला पूरक असते. अनेक कलांच्या संगमातून समाजाची निकोप वाढ होत असते. मात्र असे असले तरी कला संगम संमेलने आपल्याकडे फारशी होत नाहीत. या पार्श्वभूमीवर गेल्या वर्षापासून सिंधुदुर्ग जिल्ह्यातील साहित्य कला संगीत क्षेत्रातील मंडळी एकत्र येत साहित्य संगीत संमेलन आयोजित केले जात आहे. गेल्या वर्षीच्या पहिल्या संमेलनाचे अध्यक्ष म्हणून सुप्रसिद्ध कवी तथा चित्रपट गीतकार अजय कांडर यांची निवड करण्यात आली होती. यावर्षी दुसऱ्या साहित्य संगीत संमेलनाच्या अध्यक्षपदी साहित्य आणि कला संस्कृतीच्या अभ्यासक असणाऱ्या डॉ.निर्मोही फडके यांची निवड करण्यात आली असून डॉ. निर्मोही या ठाणे येथील लेखिका आणि मराठी भाषा–साहित्य क्षेत्रातील संशोधक आहेत. या कार्यक्रमात लेखक संजय तांबे यांना साहित्य मैत्र पुरस्कार तर सुप्रसिद्ध गायक वादक श्याम तेंडोलकर यांना संगीत मैत्र पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. त्याचबरोबर यावेळी श्याम तेंडोलकर यांची संगीत मैफल ही आयोजित करण्यात आली आहे.

संमेलनाच्या तिसऱ्या सत्रात ज्येष्ठ कवयित्री संध्या तांबे यांच्या अध्यक्षतेखाली निमंत्रितांचे कवी संमेलन आयोजित करण्यात आले असून या कवी संमेलनासाठी भालचंद्र सुपेकर, मधुकर मातोंडकर, हरिश्चंद्र भिसे, संचिता चव्हाण, रिमा भोसले, रीना पाटील, निशिगंधा गावकर, प्रियदर्शनी पारकर, संगीता पाटील, विद्या पाटील, संदेश तुळसणकर, नंदिनी रावराणे, सायली नारकर, सागर कदम, हर्षल तांबे, संजय तांबे, सिद्धेश खटावकर, विजयकुमार शिंदे, माधव गावकर, अर्चना गव्हाणकर, किशोर कदम, मेघना सावंत, पल्लवी शिरगावकर, समीक्षा चव्हाण, धम्मपाल बाविस्कर, शर्मिला केळुसकर, संदीप कदम, आर्या कदम, सुरेश पवार ,सत्यवान साटम, अमर पवार, दर्शना पाताडे, के एस वरदेकर, प्रगती पाताडे, स्वराज चव्हाण, रामचंद्र शिरोडकर, मंगेश आरेकर, नैतिक मोरजकर, सुधीर गोठणकर, सूर्यकांत साळुंखे, निलेश जाधव, मालिनी लाड, मनोहर सरमळकर, वैष्णवी सुतार यांना कविता वाचनासाठी निमंत्रित करण्यात आले आहे.

# क्वांटम तंत्रज्ञान: भविष्यासाठी एक मार्गचित्र-प्रा. (डॉ.) के . व्ही. काळे

**ज्योतिर्मय साहित्य**

छ. संभाजीनगर : छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था संचलित छत्रपती शाहू अभियांत्रिकी महाविद्यालयातील इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी (व्ही.एल.एस.आय. डिझाइन आणि तंत्रज्ञान) विभागामार्फत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद–भारतीय भाषांच्या प्रगती आणि संगोपनासाठी सशक्त समर्थन (–) अंतर्गत दोन दिवसीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. या परिसंवादा साठी ए.आय.सी.टी.ई., नवी दिल्ली यांनी रुपये २,००,०००/– इतका सहाय्यता निधी मंजूर केला होता.




सदर परिसंवाद छत्रपती शाहू अभियांत्रिकी महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे १९ व २० जानेवारी २०२६ रोजी ''क्वांटम तंत्रज्ञान: भविष्यासाठी एक मार्गचित्र'' या विषयावर यशस्वीरीत्या संपन्न झाला.

संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. रणजीत मुळे, सचिव मा. श्री. पद्माकरराव मुळे तसेच प्रशासकीय अधिकारी डॉ. श्रीकांत देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश डोंगरे व उपप्राचार्य डॉ. देवेंद्र भुयार यांच्या नेतृत्वाखाली परिसंवादाचे प्रभावी आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने झाली. प्रमुख पाहुणे म्हणून माननीय प्रा. (डॉ.) कारभारी काळे (कुलगुरू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, रायगड) आणि सन्माननीय अतिथी म्हणून डॉ. किरण लधाणे (सहसंचालक, प्रादेशिक कार्यालय, डी.टी.ई, छत्रपती संभाजीनगर) उपस्थित होते. उद्घाटनप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते परिसंवादा च्या पोस्टरचे अनावरण करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे माननीय प्रा. (डॉ.) कारभारी काळे यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (–२०२०) अंतर्गत बहुविद्याशाखीय शिक्षण, प्रादेशिक भाषेतील शिक्षणाची गरज आणि कौशल्यविकासाचे महत्त्व अधोरेखित केले. क्वांटम तंत्रज्ञान या विषयाबद्दल सखोल मार्गदर्शन करून शिक्षकांना भावी काळात संशोधनाकरिता असलेल्या संधींबद्दल मार्गदर्शन केले. तसेच क्वांटम तंत्रज्ञानाची माहिती विद्यार्थांपर्यंत पोहचवून त्यांना नाविन्यपूर्ण प्रकल्प करण्यास प्रेरित करण्याचे आव्हान केले. चा हा उपक्रम सुरु झाल्यापासून, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे संलग्नित महाविद्यालापैकी हे एकमेव महाविद्यालय आहे ज्यांना ने क्वांटम तंत्रज्ञानावर आधारित हा परिसंवाद आयोजित करण्यासाठी परवानगी दिली, त्याबद्दल विद्यापीठाच्या वतीने कौतुक केले.

कार्यक्रमाचे सन्माननीय अतिथी माननीय डॉ. किरण लधाणे यांनी औद्योगीक व शैक्षणिक क्षेत्रा मध्ये नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानातील होत असलेल्या क्रांतिकारी बदलामुळे शिक्षकांनी पण स्वता:ला अद्ययावत करणे तितकेच महत्वाचे असल्याचे सांगितले. जर शिक्षक स्वताला अद्ययावत करण्यास मागे राहिले तर त्यांचे ज्ञान हे काही काळानंतर कालबाह्य होते हे सुचविले. तसेच क्वांटम तंत्रज्ञान ही काळाची गरज असून आतापासून शिक्षकांनी याचे ज्ञान आत्मसात करून संशोधनकेंद्रित माहिती विद्यार्थांपर्यंत पोहचवण्याचे आव्हान केले व पुढील वाटचालीसाठी शुभेछ्या दिल्या.


महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश डोंगरे यांनी प्रस्तावनेमध्ये, सहभागींनाआज शिक्षक म्हणून आपली जबाबदारी फक्त अभ्यासक्रम शिकवण्यापुरती राहिलेली नसून आपल्याला विद्यार्थ्यांना भविष्यासाठी घडवायचे आहे, जिथे क्वांटम संगणन, सुरक्षित संवाद, आणि संशोधन हे केंद्रस्थानी असणार असल्याचे संबोधले. ''क्वांटम तंत्रज्ञान: भविष्यासाठी एक मार्गचित्र'' हा विषय म्हणजे केवळ अभ्यासाचा नसून, भविष्यातील विज्ञान, तंत्रज्ञान आणि भारताच्या बौद्धिक नेतृत्वाचा पाया असणार असल्याचे सांगितले. ज्या गोष्टी कालपर्यंत विज्ञानकथा वाटत होत्या, त्या आज प्रयोगशाळेत उतरल्या आहेत आणि ज्या आज प्रयोगशाळेत आहेत, त्या उद्या आपल्या विद्यार्थ्यांच्या हातात असणार आहेत. तसेच महाविद्यालयातील विविध बद्दलची माहिती दिली.

कार्याक्रमचे संयोजक व समन्वयक, डॉ. श्रीकांत होनाडे यांनी कार्यक्रमाच्या रुपरेषेमध्ये, दोन दिवसीय – प्रायोजित परिसंवादामधील सत्रांबद्दल सहभागी शिक्षकांना माहिती दिली. तसेच उपक्रमाचे सामर्थ्य, ज्यामध्ये ज्ञानाला भाषा अडथळा नसून क्वांटमसारखे अतिशय प्रगत विज्ञान मराठी भाषेतून समजणे, शिकणे आणि शिकवणे हेच खरे शैक्षणिक स्वातंत्र्य असल्याचे सांगितले. आपण अशा युगात प्रवेश केला आहे जिथे क्लासिकल संगणनाच्या मर्यादा संपत असून क्वांटम संगणन नव्या शक्यता उघडत आहे. राष्ट्रीय क्वांटम मिशन हे भारत सरकारचे महत्त्वाकांक्षी मिशन असून केंद्र सरकारने सुमारे सहा हजार पेक्षा जास्त कोटींची गुंतवणूक मंजूर केली आहे. ज्याचा उपयोग क्वांटम संशोधन, संगणन, सुरक्षित संप्रेषण आणि तंत्रज्ञानाच्या विकासासाठी केला जाणार असून भारताला जागतिक नेतृत्व मिळवून देण्याचा त्याचा उद्देश आहे असे प्रामुख्याने नमूद केले.

या परिसंवादा मध्ये विविध औद्योगिक व शैक्षणिक क्षेत्रातील नामांकित तंज्ञानी सत्रे घेतली. त्यामध्ये डॉ. विजय राठोड (प्राध्यापक व विभागप्रमुख, सेंट झेवियर्स टेक्निकल इन्स्टिट्यूट, मुंबई), श्री. मिथिलेश गायकवाड (सी.डॅक, पुणे), डॉ. गणेश पाटील (सहयोगी प्राध्यापक, व्ही.एन. आय.टी., नागपूर), डॉ. अरविंद किवळेकर (प्राध्यापक, संगणक अभियांत्रिकी विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र, विद्यापीठ, लोणेरे) आणि डॉ. रंजीत हवालदार (शास्त्रज्ञ डी, सेंटर फॉर मटेरियल्स फॉर इलेक्ट्रॉनिक्स टेक्नॉलॉजी (–), पुणे) यांनी क्वांटम कम्प्युटिंग, क्वांटम सेन्सिंग, क्वांटम अल्गोरीदम, क्वांटम कम्युनिकेशन व क्वांटम नॅनो–डिव्हाइसेस या विविध विषयांवर सखोल मार्गदर्शन केले.

मराठी भाषेत आयोजित करण्यात आलेल्या या परिसंवादास ए.आय. सी.टी.ई मान्यताप्राप्त संस्थांमधील प्राध्यापक, संशोधक, एम.टेक विद्यार्थी व संशोधन सहकारी यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. सहभागी सदस्यांनी परिसंवादामुळे क्वांटम तंत्रज्ञानाविषयी सखोल समज निर्माण झाल्याचे मत व्यक्त केले. या परिसंवादाचे आयोजन इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी (व्ही.एल. एस.आय. डिझाईन आणि टेक्नॉलॉजी ) विभागाच्या वतीने करण्यात आले होते. विभागप्रमुख व संयोजक डॉ. श्रीकांत होनाडे व सह–समन्वयक श्री. गणेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडला. उद्घाटन समारंभाचे सूत्र संचालन आभार प्रदर्शन उपप्राचार्य डॉ. देवेंद्र भुयार यांनी केले . ए. आय.सी.टी.ई–वाणी अंतर्गत मराठी या प्रादेशिक भाषेत आयोजित झालेला हा परिसंवाद संशोधन, नवोपक्रम व शैक्षणिक सहकार्याला चालना देणारा ठरला, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला.





# जात्यावरच्या ओव्या......


बोलू ऐसे बोल
कानी मधुपाचा रस
गेले जरी दुरदेशी
याद येती बारोमास ||४७४||

काय सोडून जाशील?
माणसा माघारी,
गोड गुळावाणी बोल
हेच ध्यानी धरी, ||४७५||


©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

# इंद्रायणी काठी....

ज्योतिर्मय साहित्य




लतिका धरी बोंडी नासिकाची
टिळे टोपी माळा देवाचे गबाळे,
वागवी ओंगळे पोटासाठी
गोसाव्याच्या रूपे हेरी परनारी,
तयाचे अंतरी कामलोभ
कीर्तनाचे वेळी रडे,
पडे, लोळे,
प्रेमेविण डोळे गळताती
तुका म्हणे ऐसे भाषेचे
महंत,
त्यापाशी गोविंद नाही
नाही.




तुकोबांची दुसरी पत्नी आवली. कजाग आणि कर्कश मावली. आणि तुकोबा विठ्ठल भक्त. एवढेच आम्ही जाणतो फक्त. पण खरे म्हणजे असे नव्हते. आवली असेल कजाग आणि कर्कश पण तुकोबांवर तिचे अतिशय प्रेम. म्हणतात ना ज्या व्यक्तीवर आपले प्रेम असते त्या व्यक्तीवरच आपण रागावतो. ते जेवल्याशिवाय ती तोंडात अन्नाचा कणही घेत नसे. आणि तुकोबांची योग्यता ती जाणून होती.


घरामध्ये खायला काही नसायचे. मुलेबाळे, पत्नी उपाशी. अशा परिस्थितीत एखाद्याला आपल्या संसारासाठी थोडा स्वार्थ सुचला असता तर ते क्षम्यच होते. पण तुकोबांनी त्यांच्याकडे चालून येणारा नजराणा नाकारला. शिवरायांनी त्यांच्याबद्दल अतीव आदराने तो पाठवला होता. पण ‘ काय उणे आम्हां विठोबाचे पायी ‘ या भावनेतून तो नम्रपणे नाकारला. त्यांनी त्या नजराण्यावर तुळशीपत्र ठेवले आणि म्हटले–


सोने आणि माती, आम्हा समान हे चित्ती
तुका म्हणे आले, घरी वैकुंठ सगळे.

आणि त्यांनी त्या नजराणा घेऊन आलेल्या सरदारांबरोबर निरोप पाठवला, शिवाजीराजांना सांगा ! तुम्ही स्वतः आमच्याहून थोर आहात. तुम्ही आहात म्हणून देहू गावावर परचक्र आलेले नाही. हाच नजराणा मोलाचा. आम्हाला द्रव्य काय करायचे ? आम्हाला काय उणे आहे ?

असे हे निरिच्छ तुकोबाराय. त्यांचे अभंग तरले कारण ते खऱ्या अर्थाने ‘अ–भंग’ होते. काळाच्या कसोटीवरही ते टिकून राहिले. ते अजरामर आहेत आणि राहतील. वर्षानुवर्षे समाजाला मार्गदर्शन करीत राहतील.

****



दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

# बध्दमुक्तनिरूपण


ज्योतिर्मय साहित्य

अद्वेत ब्रम्हाचे दर्शन झाल्यावर असे वाटते की ‘‘देव पहाया गेलो देव होऊन ठेलो(रहावे)असे वाटले. परत कधीही या संसाराच्या मोहपाशात अडकू नये असे ब्रम्ह निर्गुण निराकार आहे. देहबुध्दीच्या व्रुत्तीवर मन जर पूर्णपणे तदाकार झाले तर तुझे माझे हा भेदच मनातून नाहीसा व्हावा. ब्रम्ह रूपाशी एकरूप झाल्यावर पुन्हा संसारात गुंतणे आणि सामान्य व्यवहार करणेहे बरोबर नाही. तो जरपरत संसारात देहबुद्धीत येत असेल तर त्याचे ज्ञान पक्के नाही असे समजावे. ज्ञान न समजल्याने ब्रम्ह एकतर हातचे जाते आणि परमार्थाच्या नावाखाली संसार पण हातचा सुटतो. असा हा पाठशिवणीचा खेळ सतत चालु असतो. यासाठी वेदपुराण काळातील ऊदाहरण दिले आहे. ते पुढील प्रमाणे.

शुक किंवा वामदेव हे मुक्त झाले असे वेदवचन आहे. आरंभापासून अखेरपर्यंत ते दोघेच मुक्त झाले असा या वचनाचा अर्थ आहे. वेदवचन चुकीचे असणार नाही. मुक्त व ज्ञानी पुरूषांची नावे,भक्त प्रल्हाद, नारद, पराशर,पुंडलीक, व्यास,अंबरीष, शुक, शौनक,भीष्म, दाल्भ्य, रूक्मागंद, अर्जुन, वसिष्ठ, बिभीषण हे सर्व महानभक्त पुण्यपुरूष होऊन गेले.

कवि, हरि, अंतरिक्ष, प्रबुद्ध, पिप्पलायन, अविर्होत्र, द्रुमिल, चमस, करभाजन हे नवनारायणरूप महात्मे मोठे ज्ञानी व मुक्त पुरूष होऊन गेले. म्हणजेच वेदांचे ज्ञान पूर्ण पणे समजून घेतले पाहिजे अर्धवट ज्ञान म्हणजे पढतमूर्ख पणा होय.

(क्रमशः)



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

# संतांच्या संगतीचा परिणाम

ज्योतिर्मय साहित्य

जडीबुटीवाल्याजवळ एक गोळी असते. ज्याच्या अंगात विष भिनले आहे अशा माणसाच्या जखमेवर ती गोळी नुसती ठेवतात. ती सर्व विष शोषून घेते. नंतर तिला धुतली की ती पूर्ववत् होते. त्याचप्रमाणे सत्पुरुषाच्या संगतीत आपले पाप शोषून घेतले जाते, आणि पुनः तो सत्पुरुष स्वतः शुद्धच राहतो. सत्संगती मिळेल, पण ती टिकणे फार कठीण काम आहे. साधारणपणे ज्या विषयाची आपल्याला आवड असते तसलीच संगत आपण बघतो. मीच वाईट म्हणून मी वाईट लोकांची संगत धरतो. विषयात दोष नाही; म्हणजेच, नुसते विषय बाधक होत नाहीत, विषयी लोकांची संगत मात्र फार बाधक असते. संगतीने आपल्यावर बरावाईट परिणाम होतो. विषय मागूनही जो ते देत नाही, त्यांपासून परावृत्त करतो, तो संत. विषयतृप्तीसाठी जावे आणि निर्विषय होऊन यावे, हा संतसंगतीचा परिणाम. ज्याची संगत केली असताना भगवत्प्रेम प्रकट होते तो संत जाणावा. अशांची संगती केव्हा होईल ही तळमळ असावी. विषयाची गोडी फार; पण तो सुटावा असे वाटू लागले म्हणजे भजनपूजन करणाऱ्याची संगत धरावी. वाईट विचार मनात आले की नामाची जोड ठेवावी. आपला सर्वाठायी भगवद्भाव वाढू लागला म्हणजे संतांची प्रचीती येते. भगवंताच्या लीला पाहणाऱ्यांनाच खरा आनंद मिळतो. म्हणून संत नेहमी भगवंताविषयीच सांगत असतात. ते जे गातील तो संगीतातला रागच समजावा. तुकारामबुवा नुसते ‘विठ्ठल विठ्ठल’ म्हणत, पण त्याची गोडी आपल्या गाण्यामध्ये देखील नाही.

खरोखर संतांना आपल्याविषयी इतकी कळकळ असते, आपल्याला ती कळतही नाही. संत आपल्या हिताचे सांगतात, पण आपले मन विषयात वावरत असल्याने त्यांचे बोलणे आपल्या मनात पूर्णपणे ठसत नाही. औषध कडू असले तरी रोग झाल्यावर आपण ते घेतोच ना ? मग प्रपंचातल्या व्याधींनी त्रस्त होऊनही आपण संतांच्या हितकारक बोलण्याकडे का दुर्लक्ष करावे ? ज्याला भगवंताचे अधिष्ठान आहे त्याचे कडक बोलणेसुद्धा कुणाला लागणार नाही. अत्यंत निर्भयता हा संतांचा पहिला गुण आहे, कारण ‘सर्व ठिकाणी मीच आहे’ ही भावना झाल्यावर भयाचे कारणच उरत नाही. आईपण जसे सगळीकडे सारखे, त्याचप्रमाणे सर्व संत एकच भाषा बोलतात. संतांनी मिळवलेले पद मिळविण्याचे साधन आपणही करतो; पण त्यांचे करणे निःसंशय असते, तर उलट आपण नेहमी शंकाच व्यक्त करीत असतो. डोळ्यांत खुपणारा खडा काढण्यासाठी त्यात लोणी घालतात; त्याने न खुपता खडा बाहेर पडतो आणि डोळा थंड होतो. त्याचप्रमाणे संतांची वाणी गोड, मऊ, हितकारक असते; तसे आपण बोलावे.

आपली भूमिका थोडी तयार असल्यास सत्संगतीचा परिणाम होण्यास वेळ लागत नाही.

***



श्री संत ज्ञानेश्वर
अभंग व अर्थ

## अभंग - 29

जमदग्नी जनकाचा वोल भूमीं न पडावा । हाठावो वरि पितृभक्तीची आवडी । जेणें साचपणा कारणें माता वधिली । कीं पुराणें खोचिलीं तोंडीं ॥
असुरदैत्य संहारितां बापु तयांची पातकें दवडी । प्रजासि रायाची आण रायासी कवण नेमु हे तों संततपणाची प्रौढी रया ॥३॥
या परि चराचरींचे दानव गिंवसूनि पुसिले परोपरी ।
तंव यादवांसि अंबुलेपणची आस जाली थोरी । प्रभास क्षेत्रीं अवघियातें केली एकसरी । देवकी पुतना नोळखिजे । वैर भक्तीसी एकिची वोवरी ।
पवनु काय हा पंथु शोधूनियां चाले समर्थ करिल तें उजरि रया ॥४॥
या गोविंदाची माव । हे तों ब्रह्मदिकांसी कुवाडें ।
तो हा मायेचेनि साचपणें न घेपवे । प्रकृतीचे गुण ते याचिये गांवीचे । तो करील तें अनुचित बरवें ॥
लाघावियाचे भ्रमु लाघवीच जाणे यांसि कांही नवल नव्हे । बाप रखुमादेविवरु जाणीतला तरि उकलेल आघवें रया ॥५॥

अर्थ उद्याच्या भागात......




# थंडीत फक्त ५ मिनिटं गरम पाण्यात पाय घालून बसा

ज्योतिर्मय साहित्य

पाय गरम पाण्यात बुडवून ठेवणं हा उपाय सोपा वाटू शकतो पण शरीराला याचे बरेच फायदे होतात. आपले पाय दिवसभर आपल्या शरीराचा भार उचलतात, तसंच पायांनी आपण तासनतान उभं राहतो, चालतो. अशा स्थितीत शरीरासोबतच मनाला शांती मिळणंही गरजेचं असतं. नियमित याचा वापर केल्यानं अनेक आजारांपासून बचाव होतो.

गरम पाण्यात पाय ठेवल्यानं ब्लड सर्क्युलेशन चांगले होते, ताण–तणाव कमी होतो, थकवा दूर होतो. सेल्फ केअर रुटीनमध्ये या पद्धतीचा समावेश करू शकता. ज्यामुळे शरीराची हिलिंग प्रोसेस व्यवस्थित होईल. जर झोपताना तुमच्या पायांमध्ये वेदना होत असतील तर तुम्ही गरम पाण्यात पाय ठेवू झोपू शकता. ज्यामुळे तुमच्या पायांच्या नसांना आराम मिळेल आणि झोपही चांगली येईल.

पाय गरम पाण्यात ठेवल्यानं काय होतं?

गरम पाण्यात पाय बुडवून झोपल्यानं शरीराचं तापमान थोडं वाढते ज्यामुळे रक्तप्रवाह व्यवस्थित होतो. ज्यामुळे पायांच्या नसांमध्ये वेदना, ताण – तणाव कमी होतो. तर तुम्हाला दीर्घकाळ उभं राहण्याचं काम करायचं असेल तर ही हिलिंग थेरेपी तुमच्यासाठी फायदेशीर ठरू शकते. गरम पाणी तुमच्या मांसपेशींना रिलॅक्स करते याशिवाय थकवा गायब करते.

गरम पाण्यात पाय ठेवणं का फायदेशीर

पायांमध्ये पायांमध्ये सूज, वेदना होत असतील ही समस्या टाळता येऊ शकते. ज्यामुळे ताण–तणाव कमी होतो. कारण पायांना आराम दिल्यानं संपूर्ण शरीरावर याचा परिणाम होतो. हिवाळ्याच्या दिवसांत जर तुमचे पाय थंड राहत असतील तर ते गरम करण्यासाठी तसंच रक्त संचार ठीक करण्यासाठी ते फायदेशीर ठरू शकते.

गरम पाण्यात मोठे मीठ दोन चमचे. कापूर. (तीन ते चार वड्या) अर्धा लिंबू घालून पाय ठेवण्याचे फायदे

१. मिठामुळे सूज व वेदना कमी होते

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी–चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

मीठ मिसळल्यामुळे गरम पाण्याचा परीणाम अधिक वाढतो. मिठातील मॅग्नेशियम आणि अन्य खनिजं त्वचेला आराम देतात तसंच सूज कमी करण्यास मदत करतात. यामुळे डिटॉक्सिफिकेशन मध्येही मदत होते. खासकरून पायांवर दुर्गंध येत नाही. मीठाचं पाणी पायांसाठी फायदेशीर ठरते. एप्सम सॉल्ट, सैंधव मिठाचा वापर उत्तम मानला जातो. रोज थंडीत गरम पाण्यात मीठ घालून २० मिनिटं पाय यात ठेवा. ज्यामुळे पायांना वेदनांपासून आराम मिळेल. तसंच पायांना भेगासुद्धा पडणार नाहीत.

२. कापूरामुळे उबदारपणा व वेदना कमी

कापूर शरीराला उब मिळवून देतो, स्नायूंचा ताठरपणा कमी करतो.

बधिरपणा, झिणझिण्या किंवा थंडीमुळे आलेली कमी होते.

३. लिंबूमुळे स्वच्छता व टॉक्सिन काढणे (डिटॉक्स फीलिंग)

लिंबूचे गुण पायाची त्वचा स्वच्छ करतात,

दुर्गंधी कमी करतात, फंगल इन्फ क्शनचा धोका कमी करतात, ताप आल्यानंतर गरम पाण्यात पाय ठेवल्यानं काय फायदे मिळतात.

ताप आल्यनंतर पाय गरम पाण्यात ठेवणं हा जुना उपाय आहे. ज्यामुळे शरीराचं तापमान संतुलित राहतं तसंच ताप हळूहळू कमी होऊ लागतो. तसंच शरीराच्या नसा सक्रिय होता. शरीराची ऊर्जा स्थिर राहते.



# लघु बोधकथा

♦लोभापायी नुकसान♦

कोणे एके काळी बलवंतपूर हे चतुरसेन पहिलवानासाठी फार प्रसिद्ध शहर होते. चतुरसेन पहिलवान हा अत्यंत चतुर असल्याने त्याचे नाव चतुरसेन पडले होते. त्याच्या ताकदीचे व चातुर्याचे किस्से पंचक्रोशीत प्रसिद्ध होते त्यामुळे त्याच्या फारसे कोणी वाटेला जात नसे. एकेदिवशी दुस-या राज्यातुन रामशरण नावाचा एक पहिलवान त्या गावातून जात होता. गावात त्याने चतुरसेनची कीर्ति ऐकली. गावक-यांनी त्याला कुस्ती लढण्याचा आग्रह केला. दोघांमधील विजेत्यास हजार रुपयांच्या इनामाची घोषणा केली. कुस्तीस आरंभ झाला आणि पहिल्यापासूनच रामशरणने आघाडी घेतली. आपण लवकरच हरणार आहोत हे समजायला चतुरसेनला फारसा वेळ लागला नाही व त्याने पटकन रामशरणच्या कानात सांगितले की मित्रा जर तु जिंकलास तर तुला हजार रूपये मिळतील पण तू जर हरला तर मी तुला गुपचुपपणे दोन हजार रूपये देईन. यामुळे माझी गावातील इज्जतही टिकून राहिल आणि तुलाही दुप्पट पैसे मिळतील. रामशरणने सहजपणे चतुरसेनाच्या चतुर बोलण्याचा बळी ठरला व पैशांच्या लोभाने त्याच्यावर विश्वास ठेवून कुस्ती हारला. बक्षीस वितरणाचा कार्यक्रम झाल्यावर सर्व निघून गेले व चतुरसेनाकडे रामशरण गेला व म्हणाला, मित्रा तुझ्या म्हणण्याप्रमाणे मी कुस्ती हरलो आता माझे पैसे दे. यावर चतुरसेन म्हणाला, कसले पैसेबिसे घेऊन बसलास, कुस्तीत शारीरिक डावपेच तर लढवले जातात पण हा मानसिक डावपेच तुला माहित नव्हता यात रूपयापैशांचा विचार कुठे आला. तु लोभामुळे हरला आहेस जा तुझ्या गावाला.

तात्पर्य : लोभापायी सर्वस्वाची हानी होऊ शकते तेव्हा लोभापासून दूर असलेले बरे.


# महात्मा गांधींच्या पुण्यतिथीनिमित्त पुण्यात सर्वधर्म प्रार्थना; गांधी विचार कधीही संपणार नाहीत, ज्येष्ठ विचारवंत उल्हास पवार यांचे प्रतिपादन

**ज्योतिर्मय साहित्य**

**पुणे–** महात्मा गांधींच्या पुण्यतिथीनिमित्त पुणे येथील गांधी भवन, कोथरूड येथे शुक्रवारी सर्वधर्म प्रार्थना आणि भजन आयोजित करण्यात आले होते. याप्रसंगी ज्येष्ठ गांधीवादी विचारवंत आणि माजी आमदार उल्हास पवार यांनी गांधी विचारांचे महत्त्व अधोरेखित केले. ते म्हणाले की, गांधी विचार कधीही संपणार नाहीत आणि त्यांना जगभरात मान्यता व सन्मान आहे.

कार्यक्रमात मानवतेसाठी लढणारा महात्मा या ॲड. शंकर निकम लिखित पुस्तकाचे प्रकाशन शीलाताई बाबा आढाव यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी उल्हास पवार यांच्यासह डॉ. चैत्रा रेडकर, लक्ष्मिकांत देशमुख आणि अन्वर राजन व्यासपीठावर उपस्थित होते. महाराष्ट्र गांधी स्मारक निधीने या कार्यक्रमाचे संयोजन केले.

उल्हास पवार यांनी आपले अनुभव कथन करताना सांगितले की, लंडन आणि वॉशिंग्टन येथे गांधीजींच्या जीवनावर आधारित चित्रपटांचे सर्व शो हाऊसफुल्ल होते. तेथे तीन पिढ्या एकत्र बसून चित्रपट पाहत होत्या. परदेशी नागरिक



गांधीजींच्या देशातून आलेला म्हणून त्यांच्याशी संवाद साधत होते. हे गांधी विचारांच्या जागतिक प्रभावाचे द्योतक आहे.

पवार पुढे म्हणाले की, गांधीजींच्या हत्येचे सहा वेळा प्रयत्न झाले आणि त्यांचे विचार संपवण्याचे अनेकदा प्रयत्न झाले व आजही होत आहेत. गांधीजींची हत्या झाली असली तरी त्यांचे विचार आजही लोकांच्या मनात, विचारात आणि आचरणात जिवंत आहेत. त्यांच्यावर असंख्य पुस्तके लिहिली गेली आहेत. ॲड. शंकर निकम यांनी गांधी विचारांचा अतिशय बारकाईने मागोवा घेतला असून, त्यांचे वाचन व चिंतन सर्व वयोगटातील लोकांनी करावे असे आवाहन त्यांनी केले.

डॉ. चैत्रा रेडकर यांनी गांधीजींच्या जात निर्मूलनाविषयीच्या कार्यावर प्रकाश टाकला. त्या म्हणाल्या की, गांधीजींनी जात नको, पण ज्या व्यवसायामुळे जात नावास आली, तो व्यवसाय आणि ते कलाकौशल्य टिकवले पाहिजे अशी भूमिका घेतली होती. तेल घाणा कसा चालवायचा याचे ज्ञान तेली समाजातील व्यक्तींना आहे, त्याचा उपयोग राष्ट्रनिर्मितीसाठी आणि देशाला आत्मनिर्भर बनवण्यासाठी होऊ शकतो.

त्यांनी स्पष्ट केले की, तेली समाजाला वर्षानुवर्षे जातीवरून हिणवले गेले, त्यामुळे तरुण पिढी आता इतर व्यवसाय आणि नोकरीकडे वळत आहे. अशा स्थितीत जात नको, पण व्यवसाय टिकवा असे गांधीजींचे मत होते. समाजात द्वेष पसरवण्यासाठी समाजमाध्यमातून गांधीजींविषयी जो अपप्रचार केला जातो, त्याला अभ्यासपूर्ण लेख आणि अनुभवाद्वारे नेस्तनाबूत करण्याची गरज आहे.

ॲड. निकम यांनी आपल्या भाषणात सांगितले की, गांधीजींनी सत्याग्रह आणि अहिंसेच्या माध्यमातून इंग्रजांवर दबाव आणला. त्यांच्या आंदोलनात प्रत्येक जाती, धर्म आणि व्यवसायाचे लोक सहभागी होते.



## मोहितेमळा शाळेमध्ये प्रजासत्ताक दिनानिमित्त शैक्षणिक साहित्याचे वाटप

**ज्योतिर्मय साहित्य**

सातारा : प्रजासत्ताक दिन जिल्हा परिषद शाळा मोहितेमळा येथे खूप उत्साहात पार पडला. शाळेचे मुख्याध्यापक श्री.राजाराम गायकवाड सर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. ग्रामपंचायत सदस्य श्री. कुमार मोहिते, श्री.जगन्नाथ मोहिते व इतर मान्यवरांनी प्रजासत्ताक दिनानिमित्त आपली मनोगते व्यक्त केली. बालचमुंचा सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आला. त्याचबरोबर मतदार जनजागृती करण्यात आली. संगीतावर आधारित कवायत संचलन केले गेले. मी सावित्रीबाई फुले बोलते ही एकांकिका आरोही पुंडेकर हिने सादर केली. त्याचबरोबर अक्षय पुजारी सह अनेक मुलांनी भाषणांमध्ये सहभाग घेतला. त्याचबरोबर ग्रामपंचायत सदस्य श्री.कुमार मोहिते व श्री. गणेश मोहिते यांनी मुलांना शैक्षणिक साहित्याचे वाटप केले. पालक व ग्रामस्थांनी प्रजासत्ताक दिनी मुलांसाठी खाऊचे वाटप केले. शाळेच्या उपशिक्षिका सौ.रंजना सानप यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

## हरेराम पाण्डेय, मधुकर सोनवणे यांना तर्पण युवा पुरस्कार; अनाथ मुलांच्या कल्याणासाठी २०२६ चा पुरस्कार जाहीर

**ज्योतिर्मय साहित्य**

**पुणे–** अठरा वर्षांवरील अनाथ मुलांच्या कल्याण, शिक्षण आणि सक्षमीकरणासाठी कार्यरत असलेल्या तर्पण फाउंडेशनने पाचव्या तर्पण युवा पुरस्कार २०२६ ची घोषणा केली आहे. यावर्षी हा प्रतिष्ठित पुरस्कार झारखंडमधील नारायण सेवा आश्रमाचे हरेराम पाण्डेय आणि लातूर येथील खुशीग्राम फाउंडेशनचे संस्थापक मधुकर सोनवणे यांना जाहीर करण्यात आला आहे.



पुरस्कार सोहळा १ फेब्रुवारी रोजी पुण्यातील बावधन येथील हॉटेल मेरी गोल्ड बोकवेट्स येथे होणार आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, एमआयटी संस्थेच्या कार्यकारी संचालक डॉ. अदिती कराड आणि ज्येष्ठ समाजसेवक गिरीश प्रभुणे यांच्या हस्ते पुरस्कारार्थींना मानचिन्ह व १ लाख ११ हजार रुपयांचे रोख बक्षीस प्रदान करण्यात येईल. तर्पण फाउंडेशनचे संचालक आमदार श्रीकांत भारतीय यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

आमदार श्रीकांत भारतीय यांनी सांगितले की, अनाथालयातून बाहेर पडल्यानंतर १८ वर्षांवरील मुलांच्या पुढील आयुष्याचा प्रश्न गंभीर असतो. ही पोकळी भरून काढण्यासाठी तर्पण फाउंडेशनने सहा वर्षांपूर्वी विशेष उपक्रम सुरू केला. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अनाथ मुलांसाठी मदतीचे आश्वासन देत या कार्याला पाठबळ दिले होते.

सध्या फाउंडेशन राज्यातील ७२० अनाथालये आणि बालसुधारगृहांमधील १,२६१ मुलांचे शिक्षण, अन्न, निवारा व आरोग्यसेवा पुरवत आहे.

यासाठी दरवर्षी सुमारे पावणेतीन कोटी रुपयांची शैक्षणिक फी भरली जाते. योग्य शिक्षण आणि मार्गदर्शनामुळे आज ८१० अनाथ युवक प्रशासकीय सेवेत कार्यरत आहेत. तसेच, अनाथ मुलांना सरकारी नोकरीत १ टक्का आरक्षण मिळाले आहे.

याशिवाय, लग्नानंतर माहेर नसलेल्या अनाथ मुलींसाठी पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यात बऊर येथे आनंदवन माहेरवाशीण सदन लवकरच उभारण्यात येणार असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली.

मूल मराठी लेखक-सचिन वसंत पाटील हिन्दी भावानुवाद-डॉ. मीना श्रीवास्तव

## मेहनत की रोटी

नमस्कार पाठकगण! 🙏

पुरस्कार प्राप्त मराठी कथाकार सचिन वसंत पाटील की लिखी मराठी कथा "कष्टाची भाकरी" के मेरे द्वारा किये गए भावानुवाद में हिंदी दीर्घकथा "मेहनत की रोटी" का द्वितीय और अंतिम भाग आपके साथ साझा कर रही हूँ। विनायक नामक एक किसान की पीड़ा को बारीकी से उजागर करने वाले मूल मराठी लेखक सचिन जी लकवा ग्रस्त हैं एवं अधिकांश लेखन लेट कर ही कर पाते हैं। लिखने की प्रक्रिया कितनी कष्टदायक और आहिस्ता होती होगी, इसका अंदाज आप और हम शायद पूरी तरह नहीं लगा सकेंगे। लेकिन यह कहानी पढ़कर मुझे लगा कि उन्होंने अपने दर्द को ही कलम बना लिया है।

धन्यवाद! 🌹

डॉ. मीना श्रीवास्तव

पिछले दो-तीन वर्षों की तरह इस साल भी अंगूर के बाग ने धोखा दिया। ऐन मौके पर उसपर डाउनी रोग (एक फफूंद जनित गंभीर बीमारी) की बुरी नजर पड़ी और उस कारण बाग का आधा हिस्सा पूरी तरह बर्बाद हो गया। सोचा था, किसी भी हालत में प्रकार कम से कम लग लागत का ही खर्चा वसूल होगा, पर वह भी होने से रहा। तीन हज़ार बक्से अंगूर बनने की आशा थी, लेकिन घटकर आधे से भी कम हाथ में आये, बस हज़ार बारह सौ! फसल कटाई के मौसम में घनघोर बारिश ने घेर लिया। वहीं बेमौसम बरसाती बादलों का जमावड़ा किसी बिन बुलाए मेहमान की भांति आ टपका। फिर फसल की कीमतें गिर गईं। सारा कारोबार मुसीबतों के कीचड़ में धंस गया। बस इसमें व्यापारियों की चांदी हो गई, और क्या कहें

संपन्न पाटील घराने में पले बड़े विनायक ने चार साल पहले अंगूर का बाग लगाया था। पहला वर्ष तो बाग के सयानी होने में बीत गया। दूसरे साल कुछ खास ज्यादा विकास नहीं हो पाया। सोचा बेलें तो अभी छोटी ही हैं, उनकी जड़ें अभी जमीन में ठीक से जमी नहीं होंगी। तीसरे साल बेमौसम बरसात के चलते छंटाई पर कुठाराघात हो गया।


मौसम का मिजाज गर्म हो गया। तिसपर किसी बीमारी ने वायरस के रूप में बेलों को जकड लिया। देखते ही देखते सारा बाग-बगीचा हाथ से निकल गया। ऊपर रोग के लिए इस्तेमाल की गई दवाइयों के पचास हज़ार रुपये का खर्चा सर पर सवार हो गया। विडम्बना यह है कि बगीचा लगाने के लिए उठाया बैंक का कर्ज वैसे का वैसा बना हुआ है......

क्रमश:.........

## नैमिषारण्य

**ज्योतिर्मय साहित्य**

नैमिषारण्य हे भारतातील अत्यंत प्राचीन व पवित्र तीर्थक्षेत्र आहे. हे उत्तर प्रदेशातील सीतापुर जिल्ह्यात, गोमती नदीच्या काठी वसलेले आहे. हे स्थान यज्ञ, तप पुराणकथा आणि ज्ञानपरंपरेचे केंद्र मानले जाते.



नैमिषारण्य नावाची उत्पत्ती

ऋषींनी एकदा भगवान श्री विष्णूंना असे विचारले की, आम्हाला यज्ञामध्ये, असूर खूप त्रास देतात. आम्हाला यज्ञ, तप करण्यासाठी असुरांपासून मुक्त असे सर्वात योग्य असे स्थान सांगा.

यावर भगवान श्री विष्णूंनी आपले सुदर्शन चक्र सोडले व सांगितले की, ज्या ठिकाणी या चक्राची नाभी (अक्ष) खाली पडेल ते स्थान सर्वोत्तम असेल.

सुदर्शन चक्र एका निमिष म्हणजे क्षणात ज्या अरण्यात स्थिर झाले त्यालाच नैमिषारण्य असे नाव पडले.

नैमिषारण्य प्राचीन काळापासून सर्वोत्तम तपोभूमी ठरली आहे. इथेच ब्रह्मदेवांनी लोककल्याणासाठी एक दीर्घकाळ चालणारा यज्ञ केला होता. इथेच ८८ हजार ऋषी रात्र आणि दिवस तप साधना करीत होते.


आपल्यासारख्या सामान्य माणसांना, आपल्या कुटुंबाचे, आपल्या स्वतःच्या वैयक्तिक आरोग्याचे, अर्थार्जनाचे प्रश्न भेडसावीत असतात. या सर्व प्रश्नांकडे दुर्लक्ष करून, मी म्हणजे कोण? परमात्मा कसा जाणून घ्यावा? काय केले म्हणजे जनतेचे कल्याण होईल? दुःखाचे मूळ कोणते? असे उदात्त प्रश्न ऋषि मुनींना पडत. अशाच एका चर्चा सत्रामध्ये या ८८ हजार ऋषीमुनींनी,सुतजी व शौनक ऋषी यांना प्रश्न विचारला.

यातील सूतजी हे लोम हर्षन या ऋषींचे पुत्र व अधिकारी व्यक्ती होते. ते व्यास परंपरेतील सिद्ध पुरूष होते.

ऋषींनी विचारलेला प्रश्न

ऋषींनी सुतजीना प्रश्न विचारला की, कलियुगातील मानवाचा मोक्ष मार्ग कोणता? भगवानाचे श्रेष्ठ नाम, कथा व उपासना कोणती?

त्यांच्या या दिव्य प्रश्नांनी श्रीमद् भागवत पुराण उलगडल्या गेले. ज्या स्थानावर हे प्रथम घडले ते म्हणजे नैमिषारण्य होय.




काशी मुक्तीदायिनी प्रयाग कर्मदायीनी नैमिष्यारण्य ज्ञानदायीनी अशी या दिव्य क्षेत्राची ख्याती आहे.

हे केवळ तीर्थ नाही तर ते सनातन परंपरेचा श्वास आहे.

नैमिषे निमिष क्षेत्रे ऋषयः शौनकादयः /
सत्रं स्वर्गाय लोकांय सहस्र सम मासत//
भागवत १.१.१

निमिश रहित (अत्यंत पवित्र) अशा नैमिषारण्यात शौनकाधी ऋषींनी लोककल्याण व स्वर्ग प्राप्तीसाठी सहस्त्र वर्षीय यज्ञ आरंभीला.

श्रीमद्भागवता मध्ये नैमिषारण्याला अनिमिश क्षेत्र असेही संबोधले आहे.

निमिष = क्षण, काळाची गती.

अनिमीश = जिथे काळाची पकड शिथिल होते ती. **(क्रमशः)**

ज्योतिर्मय



Mutual Fund Online
Sahi hai.....
म्युच्युअल फंड ऑनलाईन
विनोद शिराळकर 9325383999

स्वप्नं जी तुम्ही Sip शिवाय पहाल...

स्वप्नं जी तुम्ही Sip शिवाय पहाल ती फक्त इच्छा म्हणून राहून जातील....
मित्रांनो, जेव्हा आपण एखादं स्वप्न पहातो तेव्हा ते पुर्ण करण्यासाठी आपल्याला झटाव लागतं.
मला एक सुंदर अलिशान बंगला बांधायचा आहे असे नुसते स्वप्न बघितले की झाले असे नाही...
बंगल्यासाठी चांगली जागा बघणे, चांगल्या आर्कीटेक्ट कडुन छान प्लॅन तयार करून घेणे, आणि सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे बंगला बांधायचा जो काही खर्च येणार आहे त्या रकमेची तरतूद करणे...हे बंगल्याचे स्वप्न पुर्ण करण्यासाठीचे टप्पे आहेत.... आणि हे विचार पुर्वक पार पाडण्यासाठी तुम्हाला आर्थिक नियोजन करावे लागेल....
आणि याच टप्प्यावर महत्वाचे आहे ते Sip ....
हे Sip जर तुम्ही केलेच नाही तर बंगल्याचे स्वप्न मग फक्त इच्छा रुपात शिल्लक राहील.
खरं आहे ना?
आणि बघा ना तुमचं प्रत्येक स्वप्न तुम्हाला एका Sip ची मागणी करतंय.
Sip म्हणजे जणू स्वप्न पुर्ण करण्यासाठीचा इन्शुरन्स.
तेव्हा स्वप्नं बघा पण त्यासाठी
Sip पण करायला विसरू नका.

आम्ही तुमचे पुस्तक प्रकाशित करू!

ज्योतिर्मय प्रकाशन

प्रत्येक लेखकाचं एकच स्वप्न असते ते म्हणजे माझ्या कवितांचे, लेखांचे, कथांचे, कादंबरीचे पुस्तकात रूपांतर व्हावे व ते जास्तीतजास्त वाचकांपर्यंत पोहोचावे, मग हे स्वप्न आम्ही पूर्ण करू.
उत्कृष्ट छपाई, साजेसे मुखपृष्ठ अगदी कमी वेळेत व अगदी बिनचूक.
मग वाट कसली बघता तुमचे स्वप्न पूर्ण करा ज्योतिर्मय प्रकाशन सोबत.
लगेच कामाला लागा व आम्हाला खाली दिलेल्या नंबरवर संपर्क करा.
ज्योतिर्मय प्रकाशन
■ पुणे ■ छ. संभाजीनगर
संपर्क : 7743 81 8559

ज्योतिर्मय साहित्याचे विद्यापीठ

साहित्यिक मित्रांनो,
आता लिहा बिनधास्त कारण आता तुमच्या साहित्याला प्रकाशित करण्यासाठी आले आहे एक भव्य व्यासपीठ
ज्योतिर्मय साहित्याचे विद्यापीठ
"ज्योतिर्मय" साहित्याचे विद्यापीठ.
साहित्यावरील प्रत्येक घटना, कथा, कविता, लेख, परीक्षण, पुरस्कार, संमेलन प्रत्येकाची नोंद आम्ही घेणार, मग विचार कसला करता!
हो जाओ शुरु....
या व्यासपीठावर तुमचे सर्वांचे स्वागत आहे.
- संजय व्यापारी, संपादक 7743918559
ज्योतिर्मय-साहित्याचे विद्यापीठ

ऑनलाईन औषधोपचार



आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज, गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे. सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.
Dr Shaikh A H - 98606 99906

# अजितदादा-एक झुंजार व वादळी व्यक्तिमत्व

ज्योतिर्मय साहित्य

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं बुधवारी (२८ जानेवारी) विमान अपघातात मृत्यू झाला. विमान बारामतीत लॅन्ड होत असतानाच हा भीषण अपघात झाला. दरम्यान, विमानात असलेल्या पाचही जणांचा मृत्यू झाला असून गुरुवारी २९ जानेवारीला बारामतीच्या विद्या प्रतिष्ठान मैदानात उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. उपमुख्यमंत्री अजित पवारांनी त्यांचे काका शरद पवार यांच्या मार्गदर्शनाखाली राजकारणाची मूलतत्त्वे शिकली. मागील १६ वर्षे महाराष्ट्रात कोणत्याही पक्षाचं सरकार असलं तरी अजित पवारांनी सर्वाधिक वेळा उपमुख्यमंत्री पद भूषवलं.

**शरद पवारांच्या मार्गदर्शनाखाली राजकारणात प्रवेश**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांच्या ४५ वर्षांच्या राजकीय कारकिर्दीत एकदा खासदार, आठवेळा आमदार आणि सहावेळा उपमुख्यमंत्री पदावर काम केलं. शिवाय, ते महाराष्ट्रात सर्वाधिक अर्थसंकल्प सादर करणारे अर्थमंत्री होते. त्यांना महाराष्ट्राच्या राजकारणाचा राजकीय केंद्रबिंदू मानले जात होते आणि त्यामुळेच मुख्यमंत्री फडणवीस यांनी त्यांचं राजकीय संतुलन राखण्यासाठी अजित पवारांना आपल्यासोबत ठेवलं. अजित पवार यांनी शरद पवारांच्या मार्गदर्शनाखाली राजकारणात प्रवेश केला. १९८२ साली एका सहकारी साखर कारखान्याच्या संचालक मंडळावर निवडून आल्यावर अजित पवार यांनी राजकारणात प्रवेश केला. १९९१ मध्ये ते पुणे जिल्हा सहकारी बँकेचे चेअरमन बनले आणि त्याच वर्षी ते पहिल्यांदा बारामतीतून काँग्रेस पक्षाचं तिकीट मिळवून खासदार म्हणून निवडून आले.

**सलग ८ वेळा आमदार**

मात्र, काही काळानंतर त्यांनी आपले काका शरद पवार यांच्यासाठी ते पद सोडलं आणि नंतर या पदासाठी शरद पवारांनी पोटनिवडणूक जिंकली आणि पी. व्ही. नरसिंह राव यांच्या सरकारमध्ये संरक्षण मंत्री झाले. त्यानंतर, अजित पवारांनी महाराष्ट्राच्या राजकारणात सहभागी होण्याचा निर्णय घेतला आणि त्यांनी १९९३ मध्ये विधानसभा निवडणूक लढली. यानंतर ते सलग ८ वेळा आमदार राहिले. अजित पवारांनी १९९३ आणि १९९५ मध्ये काँग्रेसच्या तिकिटावर महाराष्ट्र विधानसभा निवडणूक जिंकली. त्यानंतर त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या तिकिटावर निवडणूक लढवली आणि १९९९, २००४, २००९, २००१४ आणि २०२४ मध्ये आमदार झाले. जेव्हा शरद पवार मुख्यमंत्री झाले तेव्हा त्यांना मंत्री करण्यात आलं.



अशाप्रकारे, त्यांनी त्यांच्या राजकीय कारकिर्दीत स्वतःचा प्रभावही निर्माण केला.

अजितदादा पवारांनी सर्वाधिक ६ वेळा महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्रीपद भूषवलं

उपमुख्यमंत्री अजितदादा पवारांना सरकारमध्ये बरीच महत्त्वाची मंत्रीपदे भूषवण्याचा अनुभव होता, त्यांनी राज्य सरकारमध्ये कृषी, ऊर्जा आणि नियोजन राज्यमंत्री म्हणून काम पाहिलं, तसेच सुधाकर नाईक यांच्या सरकारमध्ये कृषी आणि ऊर्जा राज्यमंत्री म्हणून काम केलं. अजित पवार यांनी सर्वाधिक वेळा महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्रीपद भूषवलं आहे. त्यांनी सहा वेळा महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्रीपद भूषवले असून पहिल्यांदा २०१० ते २०१२ दरम्यान त्यांनी उपमुख्यमंत्री म्हणून काम पाहिलं. डिसेंबर २०१२ ते सप्टेंबर २०१४ पर्यंत पृथ्वीराज चव्हाण यांच्या सरकारमध्ये त्यांनी उपमुख्यमंत्री म्हणून दुसऱ्यांदा काम केलं. २०१९ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीनंतर, अजित पवार अनपेक्षितपणे भारतीय जनता पक्षात सामील झाले आणि तिसऱ्यांदा उपमुख्यमंत्री बनले. परंतु, त्यावेळी अवघ्या दोन दिवसांतच त्यांनी पदाचा राजीनामा दिला.

नंतर, अजित पवार शरद पवारांसोबत गेले आणि उद्धव ठाकरेंच्या सरकारमध्ये उपमुख्यमंत्री झाले. त्यानंतर एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेविरुद्ध बंड करून भाजपसोबत सरकार स्थापन केले आणि एका वर्षानंतर अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेसच्या ४० आमदारांसह महायुती आघाडीत ते सामील झाले. २०२३ मध्ये, अजित पवार शिंदे यांच्या नेतृत्वाखालील सरकारमध्ये पाचव्यांदा उपमुख्यमंत्री झाले आणि २०२४ च्या विधानसभा निवडणुकीनंतर, अजित पवार सहाव्यांदा उपमुख्यमंत्री झाले. अशाप्रकारे, गेल्या १५ वर्षांत स्थापन झालेल्या प्रत्येक सरकारमध्ये अजित पवार यांनी उपमुख्यमंत्री म्हणून काम पाहिले.




१९९९ मध्ये विलासराव देशमुख यांच्या नेतृत्वाखालील सरकारमध्ये सिंचन मंत्री झाल्यावर अजित पवार यांचे महाराष्ट्रातील मोठे राजकीय स्थान प्राप्त झाले . २००४ मध्ये, अजित पवार मुख्यमंत्री होऊ शकत असल्याची एक राजकीय संधी निर्माण झाली. पण शरद पवारांच्या राजकीय समीकरणांमुळे अजित पवारांना मुख्यमंत्रीपदाची खुर्ची गमवावी लागली. २००४ काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसने मिळून विधानसभा निवडणूक लढली होती. त्यावेळी, काँग्रेसला ६९ आणि ला ७१ जागा मिळाल्या होत्याकाँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये झालेल्या सूत्रानुसार, मुख्यमंत्रीपद राष्ट्रवादी काँग्रेसकडे जाणार होतं. मात्र, राष्ट्रवादी काँग्रेसला मुख्यमंत्रीपद मिळण्याची अपेक्षा असतानाच काँग्रेसचे विलासराव देशमुख मुख्यमंत्री झाले.

सुप्रिया सुळे राजकारणात येण्यापूर्वी शरद पवार आणि अजित पवार यांचे संबंध चांगले होते. अजित पवार यांना शरद पवार यांचे राजकीय उत्तराधिकारी मानले जात होते, परंतु सुप्रिया सुळे यांच्या प्रवेशानंतर परिस्थिती उलट झाली. राजकीय महत्त्वाकांक्षेने प्रेरित होऊन, अजित पवार यांनी त्यांच्या काकांपासून वेगळं होण्याचा निर्णय घेतला. २०२३ मध्ये, अजित पवार यांनी ४० आमदारांसह एकत्र येऊन राष्ट्रवादी काँग्रेसचं नेतृत्व हाती घेतलं. २ जुलै २०२३ रोजी अजित पवारांनी आपले काका शरद पवार यांच्यापासून वेगळं होऊन स्वतःचा गट स्थापन केला आणि भाजप-शिवसेना (एकनाथ शिंदे) सोबत महायुतीत सामील झाले. या निर्णयामुळे कौटुंबिक आणि राजकीय पातळीवर खळबळ उडाली. शरद पवारांपासून वेगळं झाल्यानंतर, अजितदादांनी निवडणूक आयोगाकडून राष्ट्रवादी काँग्रेसचे मूळ नाव आणि चिन्ह मिळवलं. शरद पवारांना राष्ट्रवादी काँग्रेस (एससीपी) स्थापन करण्यास भाग पाडण्यात आलं. राष्ट्रवादी काँग्रेस दोन गटात विभागली गेली असली तरी, पवार कुटुंबियांचे कौटुंबिक संबंध अबाधित राहिले.




# प्रजासत्ताक दिनानिमित्त दिल्ली येथील कर्तव्यपथावरील संचलनात महाराष्ट्राचा डंका

ज्योतिर्मय साहित्य

मुंबई - भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त नवी दिल्ली येथील 'कर्तव्यपथावर' पार पडलेल्या दिमाखदार संचलनात महाराष्ट्र राज्याच्या चित्ररथाने प्रथम क्रमांकाचा सर्वोच्च बहुमान पटकावला. आज दिल्लीत राष्ट्रीय रंगशाळा कॅंट येथे केंद्रीय संरक्षण राज्यमंत्री संजय सेठ व सहसचिव अमिताभ श्रीवास्तव यांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण करण्यात आले.

'गणेशोत्सव : आत्मनिर्भरतेचे प्रतीक' या विषयावर आधारित या चित्ररथाने महाराष्ट्राची सांस्कृतिक समृद्धी आणि आर्थिक स्वावलंबनाचे दर्शन संपूर्ण जगाला घडवले. यंदाच्या चित्ररथातून महाराष्ट्राची अष्टविनायक परंपरा, गणेशोत्सवातील सार्वजनिक सहभाग आणि या उत्सवामुळे मिळणारा लाखो हातांना रोजगार (मूर्तीकाम, सजावट, वाद्ये) यांचे प्रभावी सादरीकरण करण्यात आले होते. आत्मनिर्भर भारताच्या संकल्पनेत महाराष्ट्राचा गणेशोत्सव कसा पूरक ठरतो, हे या चित्ररथातून प्रकर्षाने मांडण्यात आले.

चित्ररथासोबत पारंपरिक वेशभूषेत लेझीम, नृत्य सादर करणाऱ्या कलाकारांनी कर्तव्यपथावर चैतन्य निर्माण केले. त्यांच्या ऊर्जेमुळेच महाराष्ट्राच्या चित्ररथाला विशेष पसंती मिळाली. शिवाय महाराष्ट्राच्या सांस्कृतिक सादरीकरण करण्यासाठी पाठवलेल्या पथकाला देखील तिसरा क्रमांक प्राप्त झाला आहे .

''महाराष्ट्राच्या मातीतील कलेचा आणि कारागिरांच्या कष्टाचा हा सन्मान आहे. गणेशोत्सव हा केवळ उत्सव नसून तो अनेकांच्या रोजगाराचे आणि आत्मनिर्भरतेचे साधन आहे, हे आपण जगाला दाखवून दिले आहे. हे यश महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवाचे आणि कलात्मक शिस्तीचे राष्ट्रीय पातळीवर झालेले ठळक दर्शन आहे, असे गौरोद्गार सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड.आशिष शेलार यांनी केले.

गौरवास्पद कामगिरीमागे सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.आशिष शेलार, सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांचे मार्गदर्शन लाभले तसेच सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक बिभिषण चवरे, यांचे दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व मोलाचे ठरले. चित्ररथ समूहातील अधिकारी, कलाकार आणि सर्व सहकाऱ्यांची मेहनत, समर्पण आणि संघभावना यामुळे हे यश शक्य झाले.

कर्तव्यपथावर महाराष्ट्राचा गौरवपूर्ण यशाने महाराष्ट्राची सांस्कृतिक ओळख अधिक उंचावली आहे. या चित्ररथाचे गीतलेखन बिभिषण चवरे यांचे असून गाण्याचे गीतकार मयुरेश सुकाळे व सिद्धेश जाधव आहे. संगीत संयोजन मनोहर गोलांबरे यांनी केले आहे.

कोल्हापूर, सातारा, सांगली ग्रामीण भागातून आलेल्या विविध कलाकारांनी तसेच चंद्रकांत पाटील व राजेंद्र संकपाळ यांच्या पथकाने सांघिक भावनेने ऐकतेचे प्रदर्शन करून उत्तमरित्या लेझीम नृत्याचे सादरीकरण केले. या चित्ररथाचे कलादिग्दर्शन व बांधणी नागपूर येथील तुषार प्रधान, रोशन इंगोले, कृष्णा सालटकर व श्रीपाद धोंगडे यांनी केले आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर : वृत्तपत्र, चळवळ आणि लोककलांचा प्रबोधनवारसा !

ज्योतिर्मय साहित्य

''डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, जसे पक्ष्याला उडण्यासाठी पंखांची गरज असते, तसेच विचारांची सुंदर आणि उंच भरारी मारण्यासाठी वर्तमानपत्रांची गरज असते.''

वर्तमानपत्र हे चळवळीला जिवंत ठेवणारी संजीवनी आहे. समाजजागृती आणि जनप्रबोधनाचे ते एक क्रांतिकारक साधन आहे म्हणूनच वर्तमानपत्र वेळेवर निघावे, हा बाबासाहेबांचा ठाम निकष होता. वृत्तपत्राला लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हटले जाते, ते उगाच नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ३१ जानेवारी १९२० रोजी 'मूकनायक' हे वर्तमानपत्र सुरू केले. 'मूकनायक' या नावातूनच बाबासाहेबांच्या वैचारिक आणि भावनिक जाणिवेचे दर्शन घडते. ज्या समाजाला वाचा नव्हती, त्या समाजाला त्यांनी शब्द दिले; बहिष्कृत माणसांमधील ''मूकनायक'' त्यांनी जागा केला.

बाबासाहेबांना वृत्तपत्र हे लोकशिक्षणाचे अत्यंत महत्त्वाचे साधन वाटत होते. खऱ्या आणि सत्य बातम्या लोकांपुढे याव्यात, ही त्यांची प्रखर भूमिका होती. लोकजागृतीसाठी उत्कृष्ट, मूल्याधिष्ठित संदेश वृत्तपत्रांतून दिला गेला पाहिजे, असे त्यांचे मत होते. समतामूलक समाज आणि न्यायाधिष्ठित व्यवस्था निर्माण करण्यासाठी वृत्तपत्र हे एक प्रभावी हत्यार म्हणून वापरावे, याद्वारे भारतीय समाज जगासमोर एक आदर्श व सुसंस्कृत समाज म्हणून उभा राहावा, ही भावना बाबासाहेबांच्या मनात खोलवर रुजलेली होती. चक्रवर्ती प्रियदर्शी सम्राट अशोकाच्या भारतनिर्मितीचे स्वप्न त्यांच्या डोळ्यांसमोर होते म्हणूनच वर्तमानपत्रांच्या माध्यमातून विचार करणारा, समाज घडविण्याचे कार्य त्यांनी अहोरात्र सुरू ठेवले.

आंबेडकरी साहित्यातून निर्माण झालेल्या नाट्यकलेच्या जाणिवा विशिष्ट वैचारिक प्रेरणेतून उदयास आल्या आहेत. त्यांचा मूलाधार फ ुलेशाहूआंबेडकरवाद आहे. बुद्धाच्या विचारधारेप्रमाणे प्रत्येक निर्मितीमागे कार्यकारणभाव महत्त्वाचा असतो. त्याचप्रमाणे लोककला व



नाट्यनिर्मितीमागेही प्रबोधनाचा ठोस कार्यकारणभाव दडलेला आहे. लोककलेच्या निर्मितीस कारणीभूत ठरणारा एक महत्त्वाचा घटक म्हणजे आंबेडकरी चळवळीचा उदय.

बाबासाहेब हयात असताना सांस्कृतिक चळवळी वेगाने विस्तारल्या. त्यांच्या महापरिनिर्वाणानंतर, विशेषतः १९७० नंतर महाराष्ट्रात दलित पँथर चे आंदोलन उभे राहिले. या चळवळींच्या माध्यमातून जात, वर्ग, वर्ण आणि स्त्रीदास्यतेवर सातत्याने प्रहार करण्यात आला. वंचित आणि शोषितांच्या हक्कांचा प्रश्न या आंदोलनांचा केंद्रबिंदू ठरला. त्यांचा विद्रोह, त्यांच्या वेदना आणि त्यांचा नकार हे तत्कालीन प्रस्थापित संस्कृती व सामाजिक मूल्यांच्या विरोधात उभे राहिले.



प्रा. डॉ. वैशाली बोदेले
नाट्यशास्त्र विभाग प्रमुख
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ

आंबेडकरी नाट्यकृतींची मुळे सामाजिक चळवळींशी घट्ट जोडलेली आहेत. विद्रोह आणि परिवर्तन हा जरी या नाट्यप्रवाहाचा कणा असला, तरी धम्म, माणुसकी, नीतिमत्ता आणि समतेचे मूल्य जपण्याची भूमिका ही रंगभूमी सातत्याने निभावत आली आहे. सत्यशोधकीय जलसे, आंबेडकरी जलसे आणि लोकनाट्य यांचा मागोवा घेतल्याशिवाय ही परंपरा पूर्णत्वास जाऊ शकत नाही.

अनेक नाट्यकृतींमध्ये लोककलेचा प्रभावी वापर करण्यात आला आहे. 'कैफियत' हे प्रा. रुस्तम अचलखांब लिखित नाटक वंचितांवर पिढ्यान् पिढ्या होत आलेल्या अन्यायाचे जिवंत चित्रण करते. तसेच संपत जाधव यांची 'पोतराज' ही कलात्मक दृष्टी जोपासणारी नाट्यकृती लोककलेतील गैरसमज आणि अंधश्रद्धा उघड करते. या नाटकातील पोतराज आपल्या पत्नीच्या आजारपणाला स्वतःला जबाबदार धरतो; प्रत्यक्षात ही धारणा चुकीची असते, तरीही तो ती स्वीकारण्यास नकार देतो, हे समाजमनाचे भयाण वास्तव दर्शविते.

नाटक हे अभिव्यक्तीचे एक प्रभावी माध्यम आहे. अभिव्यक्ती हा मूलभूत अधिकार असून, तो अधिकार आपल्याला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या माध्यमातून दिला. या अधिकाराच्या बळावर नाट्य, लोककला, भाषण, कविता, साहित्य, गीते, लोकगीते अशा विविध माध्यमांतून माणूस स्वतः ला व्यक्त करतो.

ही देण आपल्याला बाबासाहेबांच्या संघर्षामुळे मिळाली आहे. कोणत्याही महापुरुषांनी स्वतःला एका जातीपुरते मर्यादित ठेवले नाही; त्यांनी माणुसकी, समता आणि बंधुता ही मूल्ये समाजासमोर ठेवली. तरीही आपण महापुरुषांना चौकटीत अडकवतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एका समुदायाचे नसून, संपूर्ण देशाचे, इतकेच नव्हे तर संपूर्ण विश्वाचे ''विश्वरत्न'' आहेत. आपल्याला सामाजिक न्याय मिळावा, या एका उद्देशासाठी त्यांनी स्वतःच्या कुटुंबाकडेही दुर्लक्ष केले होते. एकेक करून त्यांची चार अपत्ये मरण पावली. माता रमाबाईही त्यांना सोडून गेल्या. तरीही समाज सुधारण्याचा, समानता प्रस्थापित करून देण्याचा ध्यास त्यांनी सोडला नाही. शेवटी समानतेचा हा गाडा जो मी इथपर्यंत आणला आहे, तो पुढे घेऊन जाता येत नसेल तर मागेही खेचू नका. तो आहे तसा तिथेच राहू द्या, असे देखील त्यांना म्हणावे लागले. बाबासाहेबांची ही भावना, ही तळमळ आपल्याला समजून घेणे आवश्यक आहे.

प्रबोधनाचा वारसा भाषण कलेतून पुढे आणता येतो. अनेक वक्त्यांनी आपले विचार समाजापुढे आणण्यासाठी भाषण कलेचा वापर केला. या कलेत खरं तर प्रभोधनाचा वारसा जपलेला आहे.

(क्रमशः)

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559